महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : १९

# महाराजा सयाजीराव तुलनात्मक धर्मचिंतक

देवदत्त कदम



महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन व प्रशिक्षण संस्था,
११५ म. गांधीनगर, औरंगाबाद - ४३१००५ मो. : ९८८१७४५६०४
Email : sayajiraogsps@gmail.com / www.sayajiraogaekwad.com

महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : १९

# महाराजा सयाजीराव तुलनात्मक धर्मचिंतक

देवदत्त कदम

महाराजा सयाजीराव संशोधन संस्था

महाराजा सयाजीराव
तुलनात्मक धर्मचिंतक
इतिहास
देवदत्त कदम
●
प्रकाशन क्रमांक - ३९
पहिली आवृती - २०२१
●
प्रकाशक
बाबा भांड
सचिव
महाराजा सयाजीराव गायकवाड
संशोधन-प्रशिक्षण संस्था
११५, म. गांधीनगर
औरंगाबाद - ४३१ ००५
Email : baba.bhand@gmail.com
sayajiraogsps@gmail.com
संपर्क : (०२४०) २३३२६९२
९८८१७४५६०४

महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : ई-बुक
संपादक : दिनेश पाटील
●
लेखक : देवदत्त कदम
'दत्तकृपा निवास', गर्ल्स हायस्कूलसमोर,
नवे पारगाव, ता. हातकणंगले,
जि. कोल्हापूर - ४१६११३
८६९८६६८८०२
●
मुद्रक : प्रिंटवेल इंटरनॅशनल प्रा.लि.
जी-१२, एमआयडीसी,
चिकलठाणा, औरंगाबाद
●
मुखपृष्ठ : महेश मोधे
●
वितरक : साकेत प्रकाशन प्रा. लि.
औरंगाबाद
●
किंमत : ४७ रुपये

---

- मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० अन्वये
  संस्था नोंदणी क्र. एफ - २४५९६ (औ) दि. १-१२-२०१६
- या संशोधन-प्रकाशन प्रकल्पास दिलेली देणगी प्राप्तिकर कायद्याच्या
  कलम ८०जी अंतर्गत सवलतीस पात्र
- **12AA Reg.No - ITBA/EXM/S/12AA/2018-19/ 101507596(1) - 14-02-2019**
- **80 G Reg. No - ITBA/EXM/S/80G/2019-20/ 1018507877(1) - 30-09-2019**

# महाराजा सयाजीराव ज्ञानमाला निर्मितीमागील भूमिका



महाराजा सयाजीराव गायकवाड हे फक्त आधुनिक भारतातील सगळ्यात प्रागतिक राजे होते असे नाही तर भारतासारख्या बहुसांस्कृतिक देशाचे ‘बौद्धिक नेतृत्व’च ते करत होते. धर्म, जात, तत्त्वज्ञान, शिक्षण, दातृत्त्व, संशोधन, शेती, उद्योग, आरोग्य, क्रीडा, साहित्य, संस्कृती, ललित कला, प्राच्यविद्या, पुरातत्त्व, आंतरराष्ट्रीय संबंध, स्वातंत्र्यलढा इ. मानवी समाजाच्या सर्व अंगांना कवेत घेणाऱ्या क्षेत्रात त्यांनी निर्माण केलेले मानदंड आजही भारतासाठी आदर्श आहेत. त्यामुळे ते आधुनिक भारताचे निर्माते आणि म्हणूनच खरेखुरे ‘महानायक’ सुद्धा आहेत.

महापुरुषांचे चिंतन हे फक्त इतिहासाच्या स्वप्नरंजनासाठी किंवा इतिहासाचा पोकळ अभिमान बाळगण्यासाठी करायचे नसते. आपल्या समकालीन जगण्यातील समस्यांची उत्तरे शोधण्यासाठी, आपला जीवनसंघर्ष सकारात्मक करण्यासाठीसुद्धा या महापुरुषांचे पुनर्वाचन आवश्यक असते. इतिहास जितका वस्तुनिष्ठपणे आपण वर्तमानाशी जोडू तितका आपल्या समाजाचा भविष्यवेध आपल्याला अचूकपणे घेता येईल.

महाराजा सयाजीरावांचा ‘उदोउदो’ करण्यासाठी महाराजा सयाजीराव ज्ञानमालेची निर्मिती केलेली नाही. आजच्या आपल्या धार्मिक आणि जातीय संघर्षावर, शेती-उद्योगातील संकटांवर मात करण्यासाठी तसेच समाज म्हणून आपल्यातील ‘विसंवाद’ कमी करून ‘सुसंवाद’ वाढवण्याच्या व्यापक भूमिकेतून ही महाराजा सयाजीराव ज्ञानमाला आकाराला आली. या निमित्ताने आपला तुटलेला इतिहास ‘जोडून’ वाचण्याची आणि त्यातून संवादाचे पूल उभारण्याची प्रेरणा सर्वांना मिळेल एवढे मात्र नक्की.

पहिल्या टप्प्यात साठ ई-बुक झाले आहेत.

**दिनेश पाटील**
संपादक
**महाराजा सयाजीराव**
**ज्ञानमाला ई बुक प्रकल्प**

**बाबा भांड**
सचिव
**महाराजा सयाजीराव गायकवाड**
**सं. आणि प्र. संस्था, औरंगाबाद**



# महाराजा सयाजीराव
# तुलनात्मक धर्मचिंतक

जगातील कोणत्याही समाजाच्या सर्वांगीण विकासात धर्माने सर्वात महत्त्वाची भूमिका बजावली असल्याचे जगाच्या इतिहासावरून आपल्याला दिसते. ज्या राज्यकर्त्याला धर्म सकारात्मक पद्धतीने हाताळता आला तोच राज्यकर्ता आदर्श राज्यकर्ता म्हणून इतिहासात नोंदवला गेला. भारतीय संदर्भात आपण जेव्हा विचार करतो तेव्हा तर धर्म हा अत्यंत गुंतागुंतीचा घटक ठरतो. कारण भारतातील जातिव्यवस्थेच्या संरक्षणाची भूमिका भारतीय समाजव्यवस्थेने धर्मावर सोपवली आहे. भारतातील हिंदू-मुस्लिम संघर्ष हा वरकरणी जरी धार्मिक संघर्ष वाटत असला तरी ब्राह्मण वगळता इतर तीन वर्णांना कमी-अधिक फरकाने ब्राह्मणी गुलामगिरीत जखडून ठेवण्याचे काम विषमतेचा कडवा समर्थक असणाऱ्या धर्माद्वारे होत आले आहे. त्यामुळेच भारतातील जात आणि धर्म संघर्ष एकत्रितपणे विचारात घ्यावा लागतो.

आधुनिक भारताचा विचार करता महात्मा फुल्यांपासून ते पंडित नेहरूंपर्यंतचा इतिहास तपासला असता धर्माच्या नावाखाली बहुजन जातींचा सातत्याने पराभव होत असल्याचे इतिहासातून स्पष्ट होते. याचे उत्तम उदाहरण म्हणजे शिवराय आणि राजर्षी शाहू होय. हे दोन्हीही महापुरुष जात आणि धर्म यांच्या कुटील डावपेचात पराभूत झाल्याचे आपला इतिहास सांगतो. या सर्व इतिहासाची जेव्हा आपण सयाजीकेंद्री चर्चा करतो तेव्हा सयाजीरावांचे धर्मचिंतन हेच या विषमताग्रस्त व्यवस्थेच्या पराभवासाठीचे सर्वात उत्तम शस्त्र ठरते. परंतु हिंदू धर्म चिंतनात सयाजीरावांचा साधा उल्लेखही नसणे यातच भारतातील प्रागतिक विचारांच्या पराभवाची कारणे सापडतात. त्याचप्रमाणे स्वातंत्र्यानंतरची भारतीय धर्मनिरपेक्षता पराभूत होऊन समाज अधिक जाती आणि धर्मग्रस्त का झाला याचीही कारणे सापडतात.

या पार्श्वभूमीवर पंडित नेहरूंनी फ्रेंच लेखक आंद्रे मॉर्लो यांच्या प्रश्नाला दिलेले उत्तर स्वातंत्र्योत्तर भारतीय धर्मनिरपेक्षतेसमोरील आव्हान स्पष्ट करणारे होते. आंद्रे मॉर्लो यांनी पंडित नेहरूंना त्यांच्या अखेरच्या काळात एक प्रश्न विचारला, "देशाचे पंतप्रधानपद स्वीकारल्यानंतर तुमच्या पुढचं सर्वात मोठं आव्हान काय होतं?" त्यावर नेहरूंचे उत्तर होते, 'Creating A Secular State In A Religious Society.' नेहरूंचे हे उत्तर आणि सयाजीरावांचा धर्म आणि जात साक्षरतेचा कार्यक्रम यांची तुलना केली असता सयाजीरावांचे मोठेपण लक्षात येते.

महापुरुष म्हणून सयाजीरावांचा विचार करत असताना त्यांची वैचारिक बैठक, त्यांची दृष्टी घडवण्यास नेमक्या कोणत्या गोष्टी कारणीभूत ठरल्या याचा विचार करता त्यांना लाभलेले शिक्षक, त्यांनी केलेली जगभ्रमंती आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे वयाच्या १२ व्या वर्षापर्यंत सामान्य शेतकरी कुटुंबात व्यतीत केलेले जीवन या बाबी महत्त्वाच्या ठरतातच. पण इतिहास, धर्म, समाजशास्त्र, राजकारण, तत्त्वज्ञान यासारख्या ज्ञानशाखांचा एक 'आदर्श' विद्यार्थी म्हणून त्यांनी आयुष्यभर केलेला व्यासंग हासुद्धा तितकाच महत्त्वाचा ठरतो.

जगाचा इतिहास तपासला असता एक बाब स्पष्टपणे दिसते ती अशी की, जगातील ज्या ज्या राज्यकर्त्यांनी धर्म ही संकल्पना अतिशय पद्धतशीरपणे समजून घेतली तोच राज्यकर्ता सर्वसमावेशक, लोकाभिमुख आणि आदर्श राज्यकर्ता म्हणून मान्यता पावला.

## सयाजीरावांचा तुलनात्मक धर्म अभ्यास प्रकल्प

तुलनात्मक विचार स्वधर्म, स्वजात यांच्या अतिरेकी अभिमानापासून आणि स्वश्रेष्ठत्वाच्या भावनेतून मुक्त होण्यासाठी उपयुक्त ठरतो. त्यामुळे सयाजीरावांनी स्वीकारलेले धोरण भारतासाठी सर्वोत्तम होते हे आज मागे वळून पाहताना स्पष्टपणे जाणवते. जगभरातील धर्म संकल्पनांमध्ये टोकाचे अंतर्विरोध दिसत असले तरी सर्व धर्मांचे मूलतत्त्व अंतिमत: मानव कल्याण हेच आहे ही त्यांची दृष्टी जगातील सर्व धर्मांच्या तुलनात्मक

अभ्यासातून सयाजीरावांनी कमावली दिसते. त्यामुळेच सर्व धर्मांशी संवादी नाते ते निर्माण करू शकले. आपल्या मृत्यूपूर्वी २ वर्षे १९३७ मध्ये प्रकाशित झालेल्या स्टेनले राईस यांच्या 'हिंदू कस्टम्स अँड देअर ओरिजिन्स' या ग्रंथाला सयाजीरावांनी लिहिलेल्या प्रस्तावनेतील एक अवतरण येथे आपण समजून घेतले पाहिजे.

या प्रस्तावनेत सयाजीराव म्हणतात, "जर हिंदूंना त्यांच्या धर्माचा इतिहास शिकवला आणि त्यांच्या धर्माची इतर धर्माशी तुलना करण्याची कुवत त्यांच्यामध्ये निर्माण केली तर ती अतिशय चांगली बाब ठरेल. यामुळे लोकांची मनोवृत्ती अधिक व्यापक होऊन त्यांच्या विचारामध्ये अधिक उदारता येईल. यामुळे त्यांच्या प्रगतीला उत्तेजन मिळेल."

स्वातंत्र्योत्तर भारतातील सामाजिक संघर्षाच्या घटनांचे विश्लेषण केले असता धार्मिक संघर्षात जातीचा समावेश करून धार्मिक आणि जातीय संघर्ष एकाच वेळेला वाढविण्याच्या घटना मोठ्या प्रमाणात आढळतात. आजही २०२१ मध्ये धर्माचा विचार स्वतंत्रपणेच होताना दिसतो. धर्माच्या शास्त्रीय अभ्यासावर प्रचंड साहित्यही उपलब्ध आहे. परंतु या साहित्यात तुलनात्मक धर्मविचार अपवादाने आढळतो. परिणामी भारतीय राज्यघटनेतील धर्मनिरपेक्षतेचे तत्त्व आणि सामाजिक समतेचे तत्त्वज्ञान अपेक्षित उद्दिष्ट साध्य करू शकत नाही.

या सर्व पार्श्वभूमीवर १२५ वर्षांपूर्वी सयाजीरावांनी तुलनात्मक विचारांचे महत्त्व ओळखले होते. हे महत्त्व सयाजीरावांच्या व्यक्तिगत विचारांपुरते मर्यादित नव्हते तर बडोदा संस्थानातील प्रशासकीय धोरणातही याचे प्रतिबिंब आढळते. तुलनात्मक धर्मविचाराचे सूत्र अगदी सुरुवातीपासून सयाजीरावांनी अवलंबिल्यामुळे त्यांचे प्रशासन यशस्वी ठरले. ही बाब भारताला माहीत नाही.

## भारतातील 'एकमेव' तत्त्वज्ञान आणि तुलनात्मक धर्म अभ्यास अध्यासन

१८८७ ला पहिला परदेश प्रवास करत असताना युरोपमधील समाज, संस्कृती आणि प्रगती यांच्याशी भारतातील समाजस्थितीशी ते सातत्याने तुलना करत होते हे त्यांच्या परदेश प्रवासाचे अहवाल पाहिले असता स्पष्ट होते. १८८७ पासून सुरू झालेला हा तुलनात्मक विचार १९३९ पर्यंत सयाजीरावांचा मृत्यू होईपर्यंत सतत उत्क्रांत होत गेला. हा त्यांच्या तुलनात्मक व सातत्यपूर्ण वाचन-व्यासंगाचा आणि निरीक्षणाचा परिपाक होता. म्हणूनच भारतासाठी सर्वोत्तम धर्म आणि जात साक्षरतेचा कार्यक्रम ते तयार करू शकले. सयाजीरावांची भाषणे आणि पत्रांमध्ये आपल्याला सातत्याने तुलना आढळते. धर्म आणि जात साक्षरतेचा सयाजीरावांचा प्रकल्प तुलनात्मक धर्म विचाराच्या अधिष्ठानावर तयार झाला होता. अशा प्रकारचा भारतातील हा आज अखेरचा एकमेव प्रकल्प आहे.

म्हणूनच सयाजीरावांच्या तुलनात्मक धर्म अभ्यास प्रकल्पाचा परिचय आपण येथे करून घेणार आहोत. १ ऑगस्ट १९१६ मध्ये महाराजांनी त्यांच्या बडोदा कॉलेजमध्ये तत्त्वज्ञान आणि तुलनात्मक धर्म अभ्यासाचे अध्यासन सुरू केले. अध्यासनाचे प्रमुख म्हणून केंब्रिज विद्यापीठातील या विषयाचे विद्वान प्रा.ए.जे. विजेरी यांची नेमणूक केली.

## या अध्यासनातर्फे पुढील उपक्रम सुरू करण्यात आले.

१) ऐतिहासिक धर्मांच्या ग्रंथसूची तयार करणे.

२) हिंदू आणि मुस्लिम नीतिशास्त्राबाबत सर्व्हे करणे.

३) धर्मांचा व्यवस्थितरीत्या सर्व्हे करून तो प्रकाशित करणे.

४) धर्मांचा ऐतिहासिक विकासाचा अभ्यास करण्यासाठी आणि त्यांच्यातील परस्पर संबंध तपासण्यासाठी त्यांची कालसूची तयार करणे.

५) धर्माशी संबंधित विशिष्ट विषयावर लिहिलेले प्रबंध 'गायकवाड स्टडीज इन रिलीजन अँड फिलॉसॉफी' या ग्रंथमालेत प्रकाशित करणे. या मालेसाठी बडोद्याबाहेरील विद्वानांचे सहकार्य घेणे.

१९१६ मध्ये पहिल्या वर्षी प्रा.आरते, प्रा. नवाब अली आणि प्रा. राजवाडे यांना प्रत्येकी हिंदू, इस्लाम आणि बौद्ध धर्माबाबत संशोधनात विजेरींना मदत करण्याची जबाबदारी देण्यात आली. त्याचबरोबर सदर संशोधनासाठी ३ मुस्लिम, १ जापनीज बुद्धिस्ट आणि ५ हिंदू अशा ९ संशोधक विद्यार्थ्यांची पहिल्या वर्षी निवड

करण्यात आली. बडोदा कॉलेजचे तर्कशास्त्राचे प्रा.बंबानी यांच्या नेतृत्वाखाली शीख आणि देव समाज (संप्रदाय) या धर्मांच्या सर्वेक्षणाची योजना आखण्यात आली.

प्राच्यविद्या संस्थेशी संबंधित 'इंडियन फिलॉसॉफीकल रिव्ह्यू' आणि 'इंडियन जर्नल ऑफ सोशिओलॉजी' ही दोन त्रैमासिके प्रकाशित होत होती.'इंडियन फिलॉसॉफीकल रिव्ह्यू' चे संपादन विजेरी करत होते. जुलै १९१७ मध्ये 'इंडियन फिलॉसॉफीकल रिव्ह्यू'चा पहिला अंक प्रकाशित झाला. ते चार वर्षे चालले.

या अध्यासनाबरोबरच बडोदा सेंट्रल लायब्ररीचा संस्कृत विभाग गायकवाड ओरिएंटल सिरिजच्या माध्यमातून या कामाला पूरक काम करत होता. या मालेचे पहिले संपादक पंडित चिमनलाल हे होते. १९१७ मध्ये मुंबईचे 'इरानियन असोसिएशन' आणि लंडनचे 'मॉडर्न चर्चमन' या संशोधन पत्रिकांमध्ये विभागाचे अनेक निबंध प्रकाशित झाले. या प्रकाशित निबंधांचे गुजराथी आणि मराठीमध्ये भाषांतर करण्यात आले.

१९२१ मध्ये प्रा.विजेरींनी १९१६ ते १९२१ पर्यंतच्या या विभागाच्या कामाचा आढावा घेणारा रिपोर्ट तयार करण्यास सुरुवात केली. १९२१ ते १९३५ या कालखंडात या विभागाचे कामकाज बंद होते. कारण विजेरी आपल्या मायदेशी निघून गेले होते. त्याचप्रमाणे त्यांचे साहाय्यक वैजनाथ राजवाडे यांचे अकाली निधन झाले होते. चौदा वर्षांच्या खंडानंतर १९३५ ला डॉ. मुजताब अली यांची तुलनात्मक धर्म अभ्यास अध्यासनाचे

प्रमुख म्हणून निवड झाली. १९३५ मध्ये पुन्हा सुरू झालेले अध्यासन १९४१ पर्यंत अखंडित सुरू राहिले. पहिली पाच वर्षे आणि नंतरची सहा वर्षे अशी अकरा वर्षे या विभागाने तुलनात्मक धर्म अभ्यासाला जे योगदान दिले त्याला भारताच्या इतिहासात तोड नाही. कारण अशा प्रकारचे हे भारतातील पहिले आणि शेवटचे अध्यासन होते.

१९३५ मध्ये डॉ. अलींनी तुलनात्मक धर्म या विषयावर ११ व्याख्याने बडोदा कॉलेजमधील प्राध्यापक व विद्यार्थ्यांसाठी दिली. हायस्कूल शिक्षकांच्या ट्रेनिंग कॉलेजमध्येसुद्धा तुलनात्मक धर्म या विषयावर त्यांनी व्याख्याने दिली. तर बडोदा कॉलेजमध्ये १९३६-३७ च्या पहिल्या सत्रात एक आणि दुसऱ्या सत्रात एक अशी दोन व्याख्याने तुलनात्मक धर्म या विषयावर दिली. पहिल्या सत्रात २०० विद्यार्थी व प्राध्यापक तर दुसऱ्या सत्रात १०० विद्यार्थी व प्राध्यापक या व्याख्यानांना उपस्थित होते. याच वर्षी यशपाल सिंग यांनी 'द लाईफ ऑफ मोहम्मद अँड इस्लाम' ही पुस्तिका तयार केली. १९४० मध्ये डॉ. अलींवर 'मिरत-ए-अहमदी' या ग्रंथाचा इंग्रजी अनुवाद करण्याची जबाबदारी सोपवण्यात आली. याच वर्षी एका फेलोने मोहम्मद पैगंबरांचे चरित्र आणि इस्लामची प्रमुख तत्त्वे या विषयावर हिंदी भाषेत पुस्तिका तयार केल्या.

१९३५ मध्ये महाराजांनी एक हुकूम काढून सर्व प्रमुख धर्म आणि पंथांशी संबंधित वस्तू, दागिने, कलात्मक वस्तू यांचा संग्रह बडोद्याच्या सेंट्रल म्युझियममध्ये ठेवण्याच्या सूचना केल्या. १९३६ मध्ये तुलनात्मक धर्म अभ्यास परिषदेसाठी ८ हजार ७८० रु. मंजूर करण्यात आले. आजच्या रुपयाच्या मूल्यात ही रक्कम १ कोटी ४१ लाख रु.हून अधिक भरते. तर १९३७ मध्ये अशाच परिषदेसाठी ७ हजार ५३० रु. मंजूर करण्यात आले. आजच्या रुपयाच्या मूल्यात ही रक्कम १ कोटी १९ लाख रु. हून अधिक भरते. तुलनात्मक धर्म अभ्यासाला सयाजीरावांनी दिलेले भक्कम आर्थिक पाठबळ यातून दिसून येते.

भारतासारख्या धर्मप्राबल्य असणाऱ्या देशात धर्माच्या वैज्ञानिक आणि तुलनात्मक अभ्यासाला प्राथमिक शिक्षणापासून ते उच्च शिक्षणापर्यंत सर्वच स्तरावर आजअखेर परिघाबाहेर ठेवले आहे. अपवाद राजस्थान विद्यापीठातील तुलनात्मक धर्म या एकमेव अभ्यासक्रमाचा आहे. अध्यासन मात्र भारतात कोणत्याही विद्यापीठात निर्माण झालेले नाही. या पार्श्वभूमीवर १०४ वर्षांपूर्वी सयाजीरावांनी भारतात तुलनात्मक धर्म अभ्यासाचा पाया घातला होता. त्यांचे हे काम म्हणजे धार्मिक सुसंवादासाठीचे धर्मसाक्षरता अभियान होते. अगदी आजही भारतात तुलनात्मक धर्म अभ्यासक सापडत नाहीत. भारतातील राजस्थान विद्यापीठाचा एक अपवाद वगळता विद्यापीठात तुलनात्मक धर्मशास्त्र अभ्यासक्रमातसुद्धाही नाही.

त्यामुळे स्वतंत्र अध्यासनाची चर्चाच करता येत नाही. अशा परिस्थितीत सयाजीरावांनी त्या काळात या विषयातील तज्ज्ञ उपलब्ध नसतानाही हे अध्यासन कसे चालवले असेल असा प्रश्न पडतो.

आजही सयाजीरावांनी त्या काळात तुलनात्मक धर्म अभ्यासाच्या क्षेत्रात केलेल्या कामाच्या रस्त्याने जाणारे एकही काम झालेले नाही. ११ वर्षातील या अध्यासनाच्या उपक्रमांचा आढावा घेतल्यानंतर या क्षेत्रातील संशोधनाला या विभागाने दिलेली चालना, प्रकाशित झालेले शोधनिबंध आणि ग्रंथ यांचे विषय आपल्याला थक्क करून सोडतात. यादृष्टीने १९ ऑक्टोबर १९३२ रोजी विजेरींना लिहिलेल्या पत्रातील महाराजांची भूमिका समजून घेणे उपयुक्त ठरेल. या पत्रात महाराज लिहितात, "बडोद्यामध्ये तुम्ही तुलनात्मक धर्मशास्त्र या विषयाचे प्राध्यापक होता. मला या विषयांमध्ये आजही रस आहे. मी सध्या नवीन धर्म काढण्याचा प्रयत्न करतोय, असे नाही. ते माझ्याकडून शक्य नाही, तर हिंदू धर्मातील नवीन पद्धती, त्याची तत्त्वे, प्रार्थना, गीते इ. यांना एकत्रित करून काही पुस्तके काढण्याचा प्रयत्न करतोय. याचा फायदा नव्या पिढीला होऊ शकेल. ही पुस्तके अगदी सोप्या भाषेत लिहिलेली असतील. श्रद्धेला बुद्धिप्रामाण्यवादी करण्यासाठी बराच पाठपुरावा आणि संयम लागणार आहे. जबरदस्ती किंवा सक्ती करून या बाबतीत फार काही प्रगती होऊ शकणार नाही. तुम्ही या कामात माझ्यासोबत असता तर आणखी

बरे झाले असते. काही काळापूर्वी या संदर्भात मी तुमच्याशी संपर्क केला होता; पण तेव्हा माझाच पूर्ण विचार झालेला नव्हता.” सयाजीरावांचा हा विचार भारताने वेळीच अनुसरला असता तर आजचे भारतीय समाजाचे वास्तव निश्चितच वेगळे दिसले असते.

## जगातील ‘एकमेव’ गायकवाड स्टडीज इन रिलीजन अँड फिलॉसॉफी ग्रंथमाला

बडोदा कॉलेजमधील तुलनात्मक धर्म अभ्यासाच्या अध्यासनातर्फे चालविला गेलेला एक अत्यंत रचनात्मक उपक्रम म्हणजे ‘गायकवाड स्टडीज इन रिलीजन अँड फिलॉसॉफी’ ही ग्रंथमाला होय. या ग्रंथमालेचा आरंभ १९१८ मध्ये झाला. सयाजीरावांनी मराठी, गुजराथी, हिंदी आणि इंग्रजी भाषेत ८-१० ग्रंथमाला प्रकाशित केल्या, त्यापैकी ‘द गायकवाड स्टडीज इन रिलीजन अँड फिलॉसॉफी’ ही ग्रंथमाला सगळ्यात वैशिष्ट्यपूर्ण होती. एका अर्थाने सयाजीरावांच्या विश्वबंधुत्ववादी दृष्टीची जगाला लाभलेली ही ‘बौद्धिक भेट’ होती. कारण या मालेच्या घोषणेतच ‘सहिष्णू भूमिकेतून आणि अलौकीक बुद्धिमत्तेच्या व्यासंगातून लिहिलेले ग्रंथच या मालेसाठी स्वीकारले जातील’ अशी स्पष्ट भूमिका आढळते.

या मालेत एकूण १७ ग्रंथ प्रकाशित करण्यात आले होते. विशेष म्हणजे हिंदू, बौद्ध, इस्लाम, ख्रिश्चन, ज्यू या प्रमुख धर्मांवरील ग्रंथांबरोबर तुलनात्मक धर्म अभ्यास आणि नीतिशास्त्र या

विषयांचाही त्यात अंतर्भाव होता. म्हणूनच ही ग्रंथमाला म्हणजे ‘वैश्विक भान’ जपणारा पहिला जागतिक धर्म साक्षरता उपक्रम ठरतो. जगातील आजअखेरची अशा प्रकारची ही एकमेव ग्रंथमाला आहे.

या मालेतील सर्व ग्रंथ इंग्रजीत प्रकाशित झाले होते याची दोन कारणे असावीत. पहिले कारण हे असावे की यासाठीचे संशोधक आणि लेखक एक तर परदेशी होते किंवा इंग्रजीत लिहिणारे होते. दुसरे कारण म्हणजे हे ग्रंथ प्रकाशित करत असताना जगभरातील अभ्यासकांना डोळ्यासमोर ठेवून व्यापक भूमिकेतून ती तयार केली होती. तुलनात्मक धर्म अभ्यासाचे हे ‘साक्षरता’ अभियान मुख्यत: भारताला केंद्रबिंदू मानून तयार केले होते. या मालेतील प्रत्येक ग्रंथ ३००-४०० पानांचा आहे. म्हणजेच सुमारे ७ हजार छापील पानांचा मजकूर या अध्यासनाने प्रकाशित केला.

जगातील सर्व प्रमुख धर्मांचा समावेश असणारी ही ग्रंथमाला इंग्रजी भाषेत प्रकाशित झाल्यामुळे जागतिक ‘संवाद’ निर्माण करण्यासाठी ती ‘मार्गदर्शक’ होती. या मालेतील पुस्तकांची अनुक्रमणिका चाळली असता एक विषय घेऊन त्या विषयाबद्दल जगातील वेगवेगळ्या धर्मांमध्ये काय मांडणी केली आहे याची सखोल चर्चा आढळते.

## प्रा. ए.जे.विजेरीलिखित ‘द कंपॅरेटिव्ह स्टडी ऑफ रिलीजन’ ग्रंथ

प्रा.ए.जे.विजेरी यांचा या मालेत १९२२ मध्ये प्रकाशित झालेला ‘द कंपॅरेटिव्ह स्टडी ऑफ रिलीजन’ हा ग्रंथ ४०० पानांचा आहे. या ग्रंथात ‘आत्मा’ ही संकल्पना घेऊन आत्म्याच्या कल्पनेबाबत काय मांडणी केली आहे याचा धांडोळा तुलनात्मक पद्धतीने घेतला आहे. हा ग्रंथ चाळला असता एक बाब स्पष्ट होते की धर्मविषयक मूलभूत संकल्पना सर्वच धर्मात सारख्याच आहेत. फक्त स्थलकालपरत्वे त्यांचे संदर्भ बदलले आहेत. ज्यावेळी आपण विविध धर्मांची तुलना करतो तेव्हा विविध धर्मातील साम्य आणि भेद आपल्याला कळतात. महत्त्वाचे म्हणजे भरपूर साम्य स्थळे भेटल्यामुळे स्वधर्म श्रेष्ठत्वाची भावना गळून पडते. परिणामी परधर्म द्वेषाचे विष कमी होते. संवादाच्या संधी निर्माण होतात आणि समाजाचे सामाजिक आरोग्य सुधारण्यास मदत होते. या उदाहरणावरून सयाजीराव तुलनात्मक धर्म अभ्यासातून विश्वबंधुत्वाचे पसायदान मागत होते हे लक्षात येते.

सयाजीरावांच्या दूरदृष्टीला भविष्यातील समाजाची गरज स्पष्ट दिसत होती. त्यामुळेच त्यांनी तुलनात्मक धर्म अभ्यासाचा हा ‘महायज्ञ’ सुरू केला होता. या संदर्भात ‘The Comparative Study of Religion’ ही ग्रंथमाला ज्यावर्षी सुरू झाली त्याच

वर्षी म्हणजे १९ नोव्हेंबर १९१८ रोजी लिहिलेल्या पत्रात महाराज म्हणतात, “मिसेस स्ट्रॉंग यांची भाषणे स्थानिक भाषेत भाषांतरित होऊन प्रकाशित झाली पाहिजेत असे मला वाटते. धर्माबद्दलचा तुलनात्मक व आधुनिक दृष्टिकोन लोकांसमोर आला पाहिजे. मि. विजेरी (widgery) यांनी ही योजना लवकर पूर्ण करण्यासाठी काहीतरी करायला हवे. लोकांना हे साहित्य पुरवून विचार करायला लावणे व हे ज्ञान रोजच्या समस्या सोडवण्यासाठी वापरायला लावणे ही मोठी गोष्ट आहे. धर्मशास्त्रावरील ही भाषणे काही लोकांना नक्कीच आवडतील.”

## करवीरपीठाचे शंकराचार्य कुर्तकोटीलिखित ‘द हार्ट ऑफ भगवद्गीता’

‘गायकवाड स्टडीज इन रिलीजन अँड फिलॉसॉफी’ मालेत पहिल्या वर्षी १९१८ मध्ये कोल्हापूरच्या करवीरपीठाचे शंकराचार्य कुर्तकोटी यांचा पीएच.डी. चा प्रबंध असणारा ‘द हार्ट ऑफ भगवद्गीता’ हा ग्रंथ प्रकाशित झाला होता. कुर्तकोटींनी हा प्रबंध अमेरिकेतील ओरिएंटल युनिव्हर्सिटीमध्ये पीएच.डी. पदवीसाठी सादर केला होता. हा ग्रंथही ३०० पानांचा आहे. टिळक भक्त असणाऱ्या कुर्तकोटींनी टिळकांचे ‘गीतारहस्य’ १९१५ ला प्रकाशित झाल्याच्या पार्श्वभूमीवर हे संशोधन केले होते. भगवद्गीतेवरील हे बहुधा पहिले संशोधन असावे.

त्याचप्रमाणे शाहू महाराजांनी उच्च शिक्षित आणि पुरोगामी म्हणून करवीरपीठावर शंकराचार्यपदी कुर्तकोटींची निवड केल्यानंतर लगेचच हा ग्रंथ प्रकाशित झाला होता हे विशेष.

या ग्रंथाला लिहिलेल्या प्रस्तावनेत या ग्रंथमालेचे संपादक विजेरी यांनी या ग्रंथातील वैज्ञानिक दृष्टीचे कौतुक केले आहे. या प्रस्तावनेत विजेरी म्हणतात, "कुर्तकोटी हे अस्सल संशोधक आहेत. हिंदू धर्मातील सत्यांच्या आधुनिक अन्वयार्थाचे ते समर्थक आहेत. ते भारताच्या कल्याणाचे मार्ग तयार करण्यासाठी अविरत कष्ट करणारे कार्यकर्ते आहेत. गीतेतील व्यावहारिक शिकवणीवर वाचकांचे लक्ष केंद्रित करतानाच या ग्रंथात कुर्तकोटींनी संशयास्पद बाबींची सावधपणे टाळलेली चर्चा त्यांच्या मांडणीचे वेगळेपण दर्शवते."

## द डॉक्टरीन ऑफ कर्मा

'द डॉक्टरीन ऑफ कर्मा' हा आणखी एक वैशिष्ट्यपूर्ण ग्रंथ या मालेत प्रकाशित झाला. या ग्रंथात जगातील विविध आणि प्रमुख धर्मातील कर्म सिद्धांतांची तुलनात्मक चर्चा केली आहे. या ग्रंथात विविध धर्मातील अधिकारी व्यक्तींचे निबंध एकत्रित केले आहेत. या मालेत सहिष्णू भूमिका आणि विद्वत्तापूर्ण ग्रंथांना समाविष्ट केले जात होते. याबरोबरच अत्यंत नव्या दृष्टिकोनातून धर्माचा विचार करणाऱ्या भूमिकासुद्धा या मालेत व्यक्त झाल्या होत्या. हे ग्रंथांचे शीर्षक, प्रस्तावना आणि अनुक्रमणिका चाळल्यानंतर लक्षात येते.

## अ बुद्धिस्ट बिब्लिओग्राफी

सयाजीराव महाराजांची बौद्ध धर्माबद्दलची आस्था जगजाहीर आहे. बौद्ध तत्त्वज्ञानाचा वैयक्तिक जीवनात स्वीकार करणारे ते आधुनिक भारतातील पहिले प्रशासक आहेत. पाली भाषेतील बौद्ध वाङ्.मयाचे मराठी भाषांतर, प्राचीन बौद्ध ग्रंथांचे संपादन-प्रकाशन यासाठी महाराजांनी जेवढे योगदान दिले तेवढे अन्य कोणत्याही भारतीय प्रशासकाने आधुनिक काळात दिलेले नाही. या पार्श्वभूमीवर या मालेत प्रकाशित झालेला एक अत्यंत महत्त्वाचा ग्रंथ म्हणजे 'अ बुद्धिस्ट बिब्लिओग्राफी' हा होय.

या ग्रंथाचे वैशिष्ट्य म्हणजे जगभर बौद्ध धर्माबाबत झालेल्या संशोधनाची सूची या ग्रंथात एकत्रित करण्यात आली आहे. हा ग्रंथ दोन खंडात असून पहिल्या खंडात पाली भाषेतील बौद्ध साहित्य, संस्कृत भाषेतील बौद्ध साहित्य, बौद्धेतर संस्कृत वाङ्.मयातील बौद्ध धर्माचे संदर्भ, युरोपियन भाषेतील बौद्ध साहित्याची चर्चा करण्यात आली आहे. या ग्रंथाच्या दुसऱ्या खंडात युरोपियन भाषेतील भारतीयांचे बौद्ध वाङ्.मय, श्रीलंका, ब्रह्मदेश, मलेशिया, जावा, कंबोडिया, हिमालयीन पट्ट्यातील, तिबेट, मध्य आशिया, मंगोलिया, चीन, कोरिया, जपान इ. १३ देशांतील बौद्ध वाङ्.मयाचा आढावा घेणारी सूची देण्यात आली आहे. भारतातील अशा प्रकारचा बहुधा हा पहिला ग्रंथ असावा.

या ग्रंथाच्या माध्यमातून महाराजांनी पुन्हा एकदा बौद्ध तत्त्वज्ञानाशी त्यांची असणारी बांधिलकी अधोरेखित केली आहे. हा ग्रंथ बुद्धाच्या जगभरातल्या स्वीकाराचा शोध घेणारा एक अद्वितीय प्रयत्न आहे. त्याचप्रमाणे महाराजांच्या धर्म साक्षरता अभियानातील एक महत्त्वाचा टप्पासुद्धा आहे. 'The Foreign Vocabulary of the Qur'an' हा ग्रंथ याच सिरीजमध्ये १९३८ मध्ये प्रकाशित झाला. हा ग्रंथ म्हणजे सयाजीरावांचा इस्लाम धर्मविषयक सकारात्मक दृष्टिकोन स्पष्ट करणारा प्रयत्न आहे.

## गुड अँड बॅड्स - आऊटलाइन ऑफ अ फिलॉसॉफी ऑफ लाईफ

१९२० मध्ये प्रकाशित झालेला 'गुड अँड बॅड्स-आऊटलाइन ऑफ अ फिलॉसॉफी ऑफ लाईफ' हा ग्रंथ म्हणजे विजेरी आणि सयाजीराव महाराज यांच्यातील संवाद आणि चर्चा याचा परिपाक आहे. या ग्रंथाचे 'आऊटलाइन ऑफ अ फिलॉसॉफी ऑफ लाईफ' हे उपशीर्षक फारच बोलके आहे. त्यावरून ग्रंथाच्या आशयसूत्राची स्पष्ट कल्पना येते. वाचन, अनुभव, चिंतन आणि जगप्रवास याच्या परिपाकातून ५८ वर्षांच्या अनुभवातून आणि चिंतनातून महाराजांचे जे जीवनविषयक तत्त्वज्ञान विकसित झाले होते त्याचाच परिपाक म्हणजे हा ग्रंथ होय.

महाराजांच्याबरोबर विजेरींची धर्म, तत्त्वज्ञान आणि नीतिशास्त्र यावर झालेल्या प्रदीर्घ चर्चेवर आधारित विजेरींनी बडोदा कॉलेजमध्ये दिलेली व्याख्याने असे एकंदरीत या ग्रंथाचे

स्वरूप आहे. ३१८ पानांचा हा ग्रंथ म्हणजे आदर्श माणूस म्हणून आवश्यक व्यक्तिमत्त्व कसे असावे याचा सूत्रबद्ध सिद्धांतच आहे. जात, धर्म, प्रांत यापलीकडे गेलेले व्यक्तिमत्त्व कसे असते याचा परिचय या ग्रंथातून होतो.

गुड अँड बॅड्स ग्रंथाच्या अनुक्रमणिकेवर नजर टाकली तर विषयाच्या व्याप्तीचा परिचय होतो. भौतिक मूल्ये, बौद्धिक मूल्ये, सौंदर्यशास्त्रीय मूल्ये, नैतिक मूल्ये, चांगल्या आयुष्याची एकता आणि प्राप्ती अशी एकूण ६ प्रकरणे या पुस्तकात आढळतात. धर्म, तत्त्वज्ञान, नीतिशास्त्र, संस्कृती, विज्ञान, सौंदर्यशास्त्र, निसर्ग अशा जीवनाच्या सर्व अंगांना कवेत घेणारे हे मुक्तचिंतन आजही तितकेच समकालीन होते. जीवनाशी एकरूप होऊन अत्यंत सकारात्मक आणि गुणात्मक जीवन जगण्याची दृष्टी हा ग्रंथ देतो.

## ‘तत्त्वज्ञ’ सयाजीराव

सयाजीराव महाराजांचे व्यक्तिमत्त्व मुळातच ‘तत्त्वज्ञा’चे होते. महाराजांची भाषणे हे एक प्रकारे त्यांच्यातील ‘तत्त्वज्ञ’ राजाचे मुक्त चिंतनच आहे. २४ जुलै १९१५ ला बंगलोर येथे संस्कृत विद्वतसभे(अकॅडमी)त महाराजांनी केलेले भाषण ‘गुड अँड बॅड्स’ ग्रंथातील तपशिलाशी सुसंगत आहे.

या भाषणात महाराज म्हणतात, “तत्त्वज्ञानाच्या या निरनिराळ्या पद्धतींची व प्रश्नांची चर्चा अनादिकालापासून चालत आलेली आहे, हे मी मघा सांगितलेच. त्या तात्त्विक वादविवादात दंग होऊन जाऊन, आपण आपल्या शक्तीचा

अपव्यय करणे व आपल्या प्रत्यक्ष सुखदुःखाविषयी अनास्था दर्शविणे मुळीच इष्ट नाही. मानवी ज्ञान हे केव्हाही मर्यादितच असणार आणि तत्त्वज्ञानाचे सगळेच काम पडले अमर्यादित. मी म्हणतो, तुमच्या या वादविवादातून काहीतरी निष्पन्न होऊ द्या, म्हणजे पुरे काहीतरी म्हणजे, शब्द आणि शब्द समुच्चय यांच्या पलीकडचे असे काहीतरी, की जे आपले थोडे तरी प्रत्यक्ष हित साधू शकेल. भारतीय तत्त्वज्ञानाचा अभ्यास करणे हे काम महत्त्वपूर्ण व मनोरंजक आहे आणि जगातील इतर तत्वज्ञान पद्धतीचा परिचय करून घेऊन तौलनिक अभ्यास करणे तर विशेषच महत्त्वाचे व मनोरंजक आहे. कोणताही दुराग्रह उराशी न बाळगता, मन स्वच्छ, निर्विकार ठेवून हा अभ्यास झाला पाहिजे. तत्त्वज्ञानाच्या इतर पद्धतीत काही विशेष मोलाची तत्त्वे आढळली, तर त्या पद्धतीची श्रेष्ठता मान्य करण्यास आपण तयार असले पाहिजे आणि आपल्या पद्धतीचीच तत्त्वे जर श्रेष्ठ असतील तर तिचा कैवार घेण्यात आपल्याला अभिमान वाटला पाहिजे.”

जागतिक मानववंश परिषद (१९११), अखिल भारतीय अस्पृश्यता निवारण परिषद (१९१८), अखिल भारतीय तत्त्वज्ञान परिषद (१९२७), अखिल भारतीय प्राच्यविद्या परिषद (१९३३), जागतिक शांतता परिषद, अखिल भारतीय सामाजिक परिषद, अखिल भारतीय हिंदी साहित्य संमेलन, अखिल भारतीय मराठी

साहित्य संमेलन या विद्वत परिषदांचे अध्यक्षपद सन्मानाने महाराजांकडे का आले होते याची प्रचिती ‘गुड अँड बॅड्स’ ग्रंथाच्या आशयावरून येते.

सयाजीरावांमधील तत्त्वज्ञ राजाचा मार्मिकपणे वेध सयाजीरावांचे चरित्रकार यशवंत रामकृष्ण दाते यांनी समर्पकपणे घेतला आहे. १९३३ मध्ये लिहिलेल्या महाराजांच्या चरित्रात दाते म्हणतात,“प्लेटोच्या मताने आदर्श राज्यपद्धती (ideal government) स्थापन करण्यास गुणसंपन्न व समर्थ माणसाच्या हातांत राजसूत्रे असली पाहिजेत. राज्यकारभार चालविण्यास समर्थ म्हणजे तत्त्ववेत्ता, बाकीचे असून नसून सारखेच व निरुपयोगी. तो म्हणतो की, ‘खरा तत्त्ववेत्ता ज्ञानार्थी असतो; त्याला सर्व प्रकारचे ज्ञान संपादन करण्याची उत्कट इच्छा असते; त्याचे सामान्य लोकांप्रमाणे इंद्रियगम्य बाह्य वस्तूंचा ज्ञानाने समाधान होत नाही; त्याचे तत्त्वाकडे लक्ष असते.

सत्य-असत्य, न्याय-अन्याय, बरेवाईट इत्यादीकांचे रहस्य ओळखून घेण्याकडे त्याची प्रवृत्ती असते; साधुत्वाचे धर्म (idea of the good) जाणण्याची त्यास मनस्वी इच्छा असते. तो प्रशांत, उदारमनस्क, थोर मनाचा असून त्याची स्मरणशक्ती दांडगी असते. अशा माणसांच्या हातात राज्यसत्ता दिल्यास तो एकटाच उत्तम व कार्यक्षम राज्यपद्धती स्थापन करू शकेल.’ श्रीमंत सयाजीराव महाराजांच्या अंगी प्लेटोच्या ‘तत्ववेत्या’चे सर्व गुण तंतोतंत उतरले आहेत किंवा नाहीत, हे आजतागायतच्या

त्यांच्या कारकीर्दीचे सिंहावलोकनावरून दिसून येईल. राज्यसूत्रे हातात दिल्यावर प्लेटोच्या तत्त्ववेत्याप्रमाणे आश्चर्यकारक व मतिगुंग होण्यासारखी कार्यक्षमता राज्यशकट हाकताना त्यांनी प्रकट केली, हे कोणीही कबूल करील." दातेंच्या या तुलनेवरून तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात सयाजीरावांचे ऐतिहासिक आणि आंतरराष्ट्रीय स्थान स्पष्ट होते.

## 'संवादी' तुलनात्मक धर्मचिंतक सयाजीराव

सयाजीरावांच्या धर्मसुधारणांचा अभ्यास करता एक बाब अत्यंत महत्त्वाची आहे ती अशी की सयाजीरावांचा धर्माकडे बघण्याचा दृष्टिकोन अत्यंत संतुलित होता. जगभरातील धर्म संकल्पनांमध्ये टोकाचे अंतर्विरोध दिसत असले तरी सर्व धर्मांचे मूलतत्त्व अंतिमत: मानव कल्याण हेच आहे ही त्यांची दृष्टी जगातील सर्व धर्मांच्या तुलनात्मक अभ्यासातून त्यांनी कमावली होती. त्यामुळेच सर्व धर्मांशी संवादी नाते ते निर्माण करू शकले.

याचा पुरावा सयाजीरावांच्या मृत्यूपूर्वी २ वर्षे १९३७ मध्ये त्यांनी स्टेनले राईस यांच्या 'Hindu Customs and Their Origins' या ग्रंथाला लिहिलेल्या प्रस्तावनेत मिळतो. महत्त्वाचे म्हणजे भारतासारख्या धार्मिक, जातीय आणि सांस्कृतिक विविधता असणाऱ्या देशासाठी सामाजिक सुसंवाद निर्माण करणारा एक प्रगत सिद्धांत म्हणूनच हा विचार आपण स्वीकारायला हवा. कारण आज आपल्या देशातील विषमता, विसंवाद, संघर्ष संपवण्यासाठीचा हा एकमेव उपाय आपल्यासमोर दिसतो.

१९०१ मध्ये विठ्ठल रामजी शिंदेंना तुलनात्मक धर्मशास्त्राच्या अभ्यासासाठी प्रवासवृत्ती देण्यापासून ते १९३८ मध्ये स्टेनले राईसच्या ग्रंथाला लिहिलेल्या प्रस्तावनेत धर्माच्या तुलनात्मक अभ्यासाला ते किती महत्त्व देत होते याचा आपल्याला प्रत्यय येतो. भारतात धर्माचा तुलनात्मक अभ्यास हा आपल्या राज्यकारभाराचा गाभा म्हणून स्वीकारणारा सयाजीराव हा एकमेव प्रशासक आहे.

१९१८ मधील "धर्मविषयक आधुनिक विचार तुलनात्मक दृष्टीने भाषांतर रूपानें लोकांपुढे आणण्याची व्यवस्था जरूर करावी." हा सयाजीरावांचा हुकूम या दृष्टीने आजही अनुकरणीय आहे. १८९३ मध्ये शिकागो येथील पहिल्या जागतिक सर्वधर्म परिषदेत स्वामी विवेकानंदांनी ऐनवेळी केलेले भाषण संपूर्ण भारताला परिचित आहे. परंतु संपूर्ण जगाला आदर्शवत धर्म साक्षरता प्रकल्प राबवणाऱ्या सयाजीरावांना वारंवार विनंती पत्रे पाठवून सन्मानाने दिले गेलेले १९३३ च्या शिकागो येथील दुसऱ्या जागतिक सर्वधर्म परिषदेचे अध्यक्षपद दुर्दैवाने आपल्याला माहीत नाही. यावेळी सयाजीरावांना अमेरिकन सरकारकडून गार्ड ऑफ ऑनरची मानवंदना देण्यात आली.

१९३३ मध्ये शिकागो येथील दुसऱ्या जागतिक धर्म परिषदेत अध्यक्ष स्थानावरून सयाजीरावांनी केलेले भाषण धर्माच्या परिवर्तनशीलतेचा आणि धार्मिक संवादाचा उत्तम नमुना होता. या भाषणात 'धर्म ही प्रवाही संकल्पना आहे' हे स्पष्ट

करताना सयाजीराव म्हणतात, "भौतिकशास्त्रज्ञ, वैद्यकशास्त्रज्ञ, शिल्पशास्त्रज्ञ, समाजसुधारक आणि धर्मद्रष्टे हे लोक या नव्या सृष्टीचे निर्माते आहेत. सृष्टीकर्त्या परमेश्वराचे ते एकापरीने जोडीदारच आहेत; पण स्वार्थ, जातीद्वेष, संकुचित देशाभिमान व लोभ या दुर्गुणांचे मूर्तिमंत पुतळे असणाऱ्या लोकांनी जगात सर्वत्र गोंधळ माजवून दिला आहे.'

९० वर्षांपूर्वी एक भारतीय राजा धर्म ही व्यक्तीची वैयक्तिक बाब मानून प्रत्येक व्यक्तीच्या श्रद्धा आणि आकलनानुसार तिला धर्माबाबत विचार करण्याचे स्वातंत्र्य देण्याची दृष्टी का ठेवू शकला याची प्रचिती १९३३ मध्ये सयाजीरावांनी दुसऱ्या जागतिक धर्म परिषदेत केलेल्या अध्यक्षीय भाषणात येते. या भाषणात सयाजीराव म्हणतात, 'जगातील सर्व मोठ्या धार्मिक चळवळींचा प्रारंभ धर्माच्या अशा मूल्य परिवर्तनानेच व धर्माला सर्वसुलभ करण्यानेच होत असतो. गौतम बुद्धाने आपल्या वेळच्या ब्राह्मण धर्मात जे परिवर्तन घडवून आणले ते त्या धर्माच्या सर्वसुलभ अंगावर सर्व भर देऊन व धर्मचर्चेसाठी प्राकृत लोकांची भाषा वापरूनच घडवून आणले. आजही धर्मातील कितीतरी व्याख्या बदलून नव्या करण्याची वेळ आली आहे.' जगातील सर्व धर्मांच्या तुलनात्मक अभ्यासातून सयाजीराव बुद्धाच्या विज्ञानवादाशी नाते जोडण्याचा आग्रह जागतिक मंचावरून जगाला करत होते.

महत्त्वाचे म्हणजे या भाषणानंतर ३ वर्षांनी १९३६ मध्ये बाबासाहेबांनी बौद्ध धर्माचा स्वीकार करण्याचा निर्णय घेतला. त्याचे आपण वारेमाप कौतुकही केले. परंतु जागतिक सर्वधर्म परिषदेचे एकमेव भारतीय अध्यक्ष असणाऱ्या सयाजीरावांच्या या भाषणाकडे मात्र ढुंकूनही पाहिले नाही. यातच बाबासाहेबांच्या धर्मांतराच्या पराजयाची कारणेसुद्धा सापडतात.

## भारतातील 'एकमेव' धर्मसाक्षरता अभियानाचे प्रणेते

७ मार्च १९१५ रोजी सयाजीरावांनी बडोद्यात संस्कृत पाठशाळेची स्थापना केली. धर्माचा तौलनिक अभ्यास करता यावा यासाठी संस्कृतबरोबर विद्यार्थ्यांना इंग्रजी भाषेचे शिक्षण देण्याची व्यवस्था या पाठशाळेत सयाजीरावांनी केली. या पाठशाळांमध्ये सर्व हिंदू जातींना संस्कृत शिकण्याचे स्वातंत्र्य, संधी व प्रोत्साहन दिले होते. या पाठशाळेत ३ ते १२ वर्षे कालावधीचे अभ्यासक्रम होते. हुशार विद्यार्थ्यांना दरमहा ८ ते १२ रु.च्या ५० शिष्यवृत्ती दिल्या जात होत्या.

सयाजीरावांनी १९१५ मध्ये बडोद्यात भरविलेल्या संस्कृत संमेलनातील भाषणात भारतातील संस्कृत पंडितांना पुढील सल्ला दिला होता. "सांप्रत परिस्थिती बदलत आहे, अशा वेळीं नुसता जुना कित्ता गिरवणें उपयोगी नाहीं. पाश्चात्य देशांतील तुलनात्मक व गुणदोषविवेचक बुद्धी स्वीकारून आपण त्या

भाषेचे व विषयाचें अध्ययन इतउत्तर केले पाहिजे.” सयाजीरावांना संस्कृत भाषेबद्दल अपार प्रेम होते पण आंधळा दूराभिमान नव्हता हे त्यांच्या तुलनात्मक विचारशक्तीचे फलित होते.

२३ मार्च १९१८ रोजी मुंबई येथे विठ्ठल रामजी शिंदेंनी आयोजित केलेल्या भारतातील पहिल्या अखिल भारतीय अस्पृश्यता निवारण परिषदेचे अध्यक्ष सयाजीराव होते. या परिषदेतील भाषणात सयाजीरावांनी विविध उदाहरणे देऊन जपान, चीन व हिंदुस्थान या तिन्ही देशातील धर्म संकल्पनांची तुलना करून त्या कशा सारख्या आहेत आणि त्याचा प्रवाह कसा एकाच दिशेने वाहतो हे स्पष्ट केले आहे. पुढे अमेरिकेतील दास्यमुक्तीचा जाहीरनामा व रशियाचा झार अलेक्झांडर याचे १८६१ चे आज्ञापत्र ही जपानच्या आज्ञापत्रांची भावंडेच आहेत हे सप्रमाण सिद्ध करतात.

केवळ तुलनात्मक अभ्यासामुळेच स्वधर्माचा कर्मठ अभिमान आणि परधर्माचा द्वेष यापासून मुक्त जीवन जगणे शक्य आहे अशी सयाजीरावांची धारणा होती. म्हणूनच १८ ऑक्टोबर १९०३ मध्ये लाहोर येथील आर्य समाजाच्या मानपत्राला उत्तर देताना ते म्हणतात, “धर्माधर्मात बारीक तपशिलात भेद असेल; परंतु सर्वांचा मूळ पाया व अंतिम ध्येय एकच आहे. सर्व धर्मात मूळतत्त्वे सारखीच आहेत. तपशिलात काय तो त्यांच्यात फरक असतो.”

सर्व धर्मातील मूळ समजून घेण्याचा आग्रह धरणाऱ्या सयाजीराव महाराजांनी धर्माच्या वैज्ञानिक अभ्यासाला खंबीर पाठबळ पुरवले. याच वर्षी १९०१ मध्ये विठ्ठल रामजी शिंदे यांना धर्माच्या तुलनात्मक अभ्यासासाठी ऑक्सफर्डला जाण्यासाठी सयाजीरावांनी १५०० रु. प्रवास खर्च दिला. पुढे शिंदे यांच्या अस्पृश्योद्धाराच्या कार्याला सयाजीरावांनी भक्कम पाठबळ दिले. १९०१ मध्येच बनारसच्या सेंट्रल हिंदू कॉलेजला धर्मशिक्षणाकरिता १ हजार रु.ची मदत सयाजीरावांनी केली.

तर सयाजीरावांच्या वैश्विक दृष्टीचे अजून एक उदाहरण म्हणजे १९२९ मध्ये सयाजीरावांनी 'भारतीय संस्कृती' या विषयाशी संबंधित शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यासाठी दोन हजार पौंडची मदत पॅरिस विद्यापीठाला दिली होती. आजच्या रुपयाच्या मूल्यात ही रक्कम १९ लाख रु.हून अधिक भरते.

## स्वामी हंसस्वरूप यांना उत्तर

सप्टेंबर १९०१ मध्ये हिंदू धर्माचे अधिकारी भाष्यकार म्हणून प्रसिद्ध पावलेल्या स्वामी हंसस्वरूप यांची बडोद्यात दहा जाहीर व्याख्याने दसरा चौकात झाली. ही व्याख्याने बडोद्यातील सनातनी मंडळींनी आयोजित केली होती. बडोदेकरांवर खूपच प्रभाव पडलेली ही भाषणे ऐकण्याची इच्छा महाराजांनी व्यक्त केली. या इच्छेनुसार स्वामी हंसस्वरूप या उच्चशिक्षित हिंदू धर्मपंडितांच्या परंपरावादी हिंदू धर्माचा पुरस्कार करणारी पाच व्याख्याने २२ ते २६ सप्टेंबर १९०१ या दरम्यान सयाजीराव

महाराजांसाठी लक्ष्मीविलास राजवाड्यातील आयने महाल दिवाणखाण्यात रात्री ९ ते १०.३० या वेळात आयोजित करण्यात आली. विशेष म्हणजे या व्याख्यानासाठी प्रमुख ४००-५०० लोकांना निमंत्रित करण्यात आले होते.

स्वामी हंसस्वरूप हे उच्चशिक्षित विद्वान होते. परंतु सनातनी हिंदू धर्माचा ते टोकाचा अभिमान बाळगत होते. धर्मातील 'जैसे थे वादी' तत्त्वज्ञानाचा त्यांचा आग्रह विज्ञानवादी सयाजीरावांना पटला नाही. या पाच भाषणांना हजर राहून महाराजांनी स्वामी हंसस्वरूप यांची भूमिका समजून घेतली. स्वामी हंसस्वरूप यांच्या शेवटच्या भाषणाच्या अध्यक्षीय समारोपात महाराजांनी उपस्थितांना स्वामींच्या भाषणाबद्दल कोणाला बोलायचे असल्यास बोलावे असे आवाहन केले. श्रोत्यांपैकी कोणीच काही बोलत नाही हे पाहून उत्स्फूर्तपणे आपले आक्षेप नोंदवत सयाजीरावांनी स्वामी हंसस्वरूप यांचा प्रतिवाद करणारे २ तासाचे भाषण केले.

या भाषणात महाराज म्हणतात, "स्वामींनी धर्मांवर श्रद्धा व ईश्वराची भक्ती यांचे इतके जरी वर्णन केले; तरी त्या बाबतीत पुढे काहीच प्रयत्न न करिता केवळ वेदपठण किंवा पूजाअर्चा करणे, यापासून आपल्या देशबांधवास आपला काय उपयोग होणार ? नुसत्या भक्तीने किंवा ईश्वर-भजनाने काही होणार नाही. आपणास आपल्या लोकांची नीती सुधारली पाहिजे. जुन्या तत्त्वज्ञानाचा अथवा धर्माचा अभ्यास म्हणजे फक्त ज्ञानासंबंधी चमत्कारिक माहिती मिळविणे होय. जोपर्यंत आपण आपली नीती, सद्गुण,

औदार्य व सर्वांची सहानुभूती ही अधिक वाढविण्याचा प्रयत्न करीत नाही तोपर्यंत अशा निष्फळ वादात अगर नुसते ‘विठ्ठल’ म्हणत राहण्यात काही अर्थ नाही.” सयाजीरावांनी १२० वर्षापूर्वी सांगितलेला धर्माच्या वैज्ञानिक अभ्यासापाठीमागचा उद्देश आजच्या भारतालासुद्धा अनुकरणीय आहे.

याचवेळी स्वामी हंसस्वरूप यांच्या कर्मठ विचारांवर हल्ला चढवताना सयाजीरावांनी घेतलेली भूमिका हिंदू धर्म आणि जातिव्यवस्था यांच्यातील राजकारणावर प्रकाश टाकणारी होती. जगातील अनेक देशांचे दाखले देऊन धर्मविषयक कर्मठ भूमिका सोडण्याची गरज व्यक्त करताना या भाषणात सयाजीराव म्हणतात, “आपल्यामध्ये आजमितीला जशा आपण जाती अगर वर्ण पाहतो तशाच प्रकारच्या काही अंशी जाती अगर वर्ण निरनिराळ्या देशातही यापूर्वी होऊन गेल्या आहेत. ग्रीक, रोमन, इजिप्शियन, पेरूव्हियन, मेक्सिकन वगैरे लोकांतही निरनिराळ्या जाती एकवेळ होत्या. फार तर काय, आपल्या देशात सूर्यवंशी, सोमवंशी आपणास म्हणविणारे लोक जसे आजमितीस आहेत; तसेच लोक पेरूमेक्सिको इत्यादी देशातही एके वेळी होते. यावरून असे म्हणता येईल की, वरील देशात ईश्वरनिर्मित जाती आहेत असे मानण्याचे कारण दिसत नाही.” जगभरातील विविध समाजातील जातिव्यवस्थेची सयाजीरावांनी दिलेली उदाहरणे हा त्यांच्या सातत्यपूर्ण तुलनात्मक धर्म अभ्यासाचा परिपाक होता.

याचवेळी सयाजीरावांनी स्वामी हंसस्वरूप यांच्यासारख्या अधिकारी हिंदू धर्मपंडितासमोर धर्माचे खरे स्वरूप स्पष्ट केले. सयाजीराव म्हणतात "मी म्हणतो, नुसती आमचे धर्मांवर आमची श्रद्धा आहे असे म्हणण्यात काही तात्पर्य नाही; प्रसंग पडल्यास ती आपपरतेचा भेद न ठेविता व्यक्त होईल तरच उपयोग. याकरिता आपणा सर्वांना आपल्या धर्मातील हरेक जातीशी सहानुभूती दाखवली पाहिजे. रस्त्यात आपण हजारो आंधळे, लंगडे, रोगग्रस्त व दुर्बळ असे लोक पाहतो व वास्तविक पाहता अशाच लोकांना मदत केली पाहिजे आणि त्यानेच खरा धर्म होतो." हंसस्वरूप यांचे सर्व मुद्दे खोडून महाराजांनी त्यांना माफी मागण्यास भाग पाडले होते. माफी मागताना स्वामी हंसस्वरूप म्हणाले, 'महाराज, आपलं म्हणणं मला मान्य आहे. आपल्याला विरोध करण्याची माझ्यासारख्याची योग्यता नाही.' स्वामी हंसस्वरूप ही सामान्य आसामी नव्हती. त्यांची कीर्ती संपूर्ण भारतात हिंदू धर्माचे अधिकारी भाष्यकार अशी होती. या प्रसंगातून महाराजांच्या धर्मचिकित्सेवरील अधिकाराची प्रचिती येते.

महाराजांच्या या भाषणावर वर्तमानपत्रात बरीच टीका झाली. यासंदर्भात १ ऑक्टोबर १९०१ रोजी टिळकांनी केसरीत 'श्री गायकवाड सरकार यांचा वेदांत' हा अग्रलेख लिहिला. या अग्रलेखात टिळक म्हणतात, 'अशा प्रकारचे भाषण करणे योग्य नसून वेदांतासारख्या गहन विषयावर मत देण्याचा महाराजांना

अधिकार नाही.’ टिळकांची ही भूमिका त्यांची सामाजिक परिवर्तनासंदर्भातील विचाराचे द्योतक आहे. ३० जानेवारी १९२८ रोजी सदाशिव विनायक बापट यांनी त्यांच्या ‘लोकमान्य टिळक यांच्या आठवणी आणि आख्यायिका’ या ग्रंथासाठी सयाजीरावांची बडोद्यात मुलाखत घेतली.

या मुलाखतीत बापटांनी सयाजीरावांना टिळकांच्या कार्याविषयी त्यांचे मत विचारले असता सयाजीरावांनी टिळकांच्या ‘गीतारहस्य’ ग्रंथाविषयीचे मत मांडले. सयाजीराव म्हणतात, “टिळकांनी गीतारहस्य हा ग्रंथ चांगला लिहिला आहे, यांत शंका नाही. तरी पण त्यांतील जातिभेदाविषयी त्यांचे विचार आम्हास मान्य नाहींत. त्यांनी या बाबतींत आपले प्रगतीपर धोरण ठेविले असे आम्हास वाटत नाही. राष्ट्रीय प्रगतीमध्ये सामाजिक प्रगतीचा अंतर्भाव होतो. आपली गृहनीती व समाजनीती पायाशुद्ध, बिनभेदभाव ठेवणारी अशी श्रेष्ठ प्रकारची झाल्याशिवाय राष्ट्रोन्नती होणे शक्य नाही व कदाचित झाल्यास ती फार वेळ टिकावयाची नाही.” आज ‘विश्वगुरु’ बनण्याचे स्वप्न पाहणाऱ्या भारताला आपल्या स्वप्नपूर्तीसाठी सयाजीरावांनी सांगितलेल्या राष्ट्रोन्नतीच्या तत्वज्ञानावरच चालावे लागेल.

या संदर्भात काशीनाथ नारायण गोत्री यांनी १९१० मध्ये लिहिलेल्या महाराजांच्या चरित्रात महाराजांच्या धर्मचिकित्सक दृष्टिकोनाचे महत्त्व विशद करताना म्हटले आहे, ‘परंतु महाराजांनी केलेल्या उपदेशाप्रमाणेच ते नवे व जुने यातून घेण्यासारखा

भाग ग्रहण करीत आहेत. कोणत्याही पक्षाभिमानाचा दुराग्रह धरीत नाहीत. हे खरोखरच त्यांना अत्यंत भूषणास्पद होय. अशा प्रकारची वृत्ती होणे किती कठीण आहे व त्यांना केवढी विद्वत्ता व समंजस शक्ती असावी लागते याचा सुज्ञ वाचकांनी विचार करावा.'

महात्मा फुल्यांनी धर्माच्या प्रश्नाची धारधार चिकित्सा करून विचार आणि कृती अशा दोन्ही स्तरांवर पायाभूत काम केले. महात्मा फुलेंच्या या पायाभूत कामामुळेच त्यांना आपण भारतीय समाज क्रांतीचे जनक मानतो. सयाजीराव महाराजांचे हे मूळ संपूर्ण भाषण वाचत असताना महात्मा फुल्यांच्या सत्यशोधकी धर्मचिकित्सेचा अधिक उत्क्रांत टप्पा महाराजांनी गाठला होता याची प्रचिती येते.

आपल्यासाठी प्रेरणादायी, दिशादर्शक असणाऱ्या आदर्श लोकांचेच फोटो आपण बैठकीच्या खोलीत लावतो. महाराजांचे कार्य, विचार आणि कर्तृत्व पाहून महात्मा फुलेंनी पत्राद्वारे महाराजांचा एक फोटो मागवला. प्रथम सयाजीरावांनी आपला राजवेषातील फोटो फुलेंना पाठवला. तेव्हा या फोटोऐवजी साध्या वेशातील फोटो पाठवण्याची विनंती फुलेंनी महाराजांकडे केली. त्यानुसार सयाजीरावांनी आपला साध्या वेशातील फोटो महात्मा फुलेंना पाठवला. हा फोटो महात्मा फुलेंनी आपल्या

बैठकीच्या खोलीत लावला. यावरून महात्मा फुले महाराजांना आदर्श मानत असल्याचे सिद्ध होते. संपूर्ण महाराष्ट्र ज्या फुलेंना आदर्श मानतो ते सयाजीरावांना आदर्श मानत होते. यातच 'पुरोगामी' महाराष्ट्राचा 'इतिहास' लपला आहे.

## बडोद्याचे स्वतंत्र धर्म खाते

राजवाड्यापासून धर्म सुधारणेची सुरुवात करणाऱ्या सयाजीरावांनी संस्थानातील धर्म सुधारणेसाठी एप्रिल १९१७ मध्ये स्वतंत्र धर्म खात्याची सुरुवात केली. या विभागाचे प्रमुख म्हणून जगदीशचंद्र चटर्जी यांना धर्माधिकारी पदी नेमण्यात आले. त्याचवेळी जमनादास गंगाराम मेहता यांची धर्माधिकाऱ्यांचे प्रमुख साहाय्यक म्हणून नेमणूक करण्यात आली. धर्म खात्याची सुरुवात करताना सयाजीरावांनी या खात्याला जबाबदारी निश्चित करून दिली होती. त्यानुसार धर्म खात्याला देवस्थान विभाग, संस्कृत पाठशाळा, पुरोहित वर्ग, धार्मिक शिक्षणाची जबाबदारी देण्यात आली.

त्याचबरोबर सार्वजनिक दानधर्म संस्थांचे नियमन, संस्कृत, पुरातत्त्वशाखीय व प्राच्यविद्याविषयक संशोधन, प्राचीन हस्तलिखितांचे संकलन, गायकवाड ओरिएन्टल सिरीजचे प्रकाशन याचीदेखील जबाबदारी सयाजीरावांनी धर्म खात्यावर सोपवली. १९१७ पासूनच धर्म खात्याच्या वतीने प्राचीन भारतीय संस्कृती आणि तुलनात्मक धर्म या विषयांवर सार्वजनिक

व्याख्यानांचे आयोजन करण्यात येऊ लागले. धर्म खात्याच्या वतीने बडोदा व अमरेली जिल्ह्यातील काही मंदिरांमध्ये धर्मविषयक प्रबोधन करण्यासाठी धार्मिक उपदेशक नेमण्यात आले. हे धार्मिक उपदेशक बडोदा व अमरेली जिल्ह्यातील खेड्यांमध्ये सामाजिक व धार्मिक बाबींमध्ये समाजप्रबोधन करीत.

धर्म खात्याच्या स्थापनेनंतर धर्म अधिकाऱ्याच्या नावे राखीव व साधारण असे दोन प्रकारचे निधी निश्चित करण्यात आले. या निधीतून आरोग्य व शिक्षणावर खर्च करण्यास परवानगी देण्यात आली. त्यानुसार १९१७-१८ मध्ये कडी जिल्ह्यातील औषधालयावर १२,००० रु. व बडोद्याच्या महाराणी चिमणाबाई साहेब प्रसूतिगृहासाठी ३०० रु. खर्च करण्यात आले. तसेच अमरेलीच्या अनाथालयास वार्षिक २,४५० रु. निधी देण्याचा निर्णय घेण्यात आला.

धर्म खात्याची रचना, खात्यावर सोपवण्यात आलेल्या जबाबदाऱ्या आणि देण्यात आलेले अधिकार यांचा विचार करता सयाजीरावांनी या खात्याच्या माध्यमातून प्रशासकीय पातळीवर धर्म सुधारणेचा प्रयोग यशस्वी केला. स्वतंत्र धर्म खाते स्थापन करून समाजात धर्मपरिवर्तन घडवून आणणारे सयाजीराव हे आधुनिक इतिहासातील पहिले प्रशासक ठरतात.

## सर्व धर्मीयांना मदत

आयुष्यभर धर्म साक्षरतेतून सुधारणेचा महाप्रकल्प राबवणाऱ्या सयाजीरावांनी वेळोवेळी सर्व धर्मीयांना विविध कार्यासाठी मदत केली. १८८८ मध्ये क्षात्रधर्म प्रतिपादक सभेला २०० रुपयांची मदत केली. १८८८ मध्येच बडोद्याचे माजी दिवाण काजीसाहेबांच्या स्मारक फंडास १ हजार रु.ची मदत दिली. १९०३ मध्ये दिल्ली हिंदू कॉलेजच्या बक्षीस समारंभास २ हजार रु.ची मदत सयाजीरावांनी केली होती. १ डिसेंबर १९०४ रोजी जैन परिषदेचे सयाजीरावांच्या हस्ते उद्घाटन झाले. या परिषदेला सयाजीरावांनी १००० रु.ची मदत केली. १९०४ मध्ये पंचांग संशोधन मंडळास १ हजार रु.ची मदत सयाजीरावांनी केली.

१९०७ मध्ये अंजुमान-इ-इस्लाम संस्थेच्या इमारतीसाठी सयाजीरावांनी अब्बास तय्यबजी यांना २० हजार रु.ची मदत केली. या मदतीच्या ५ वर्षे आधी ३ सप्टेंबर १९०२ रोजी सयाजीरावांनी या संस्थेला भेट दिली होती. यावेळच्या भाषणात आपली मुसलमानविषयक भूमिका स्पष्ट करताना सयाजीराव म्हणतात, "मी स्वतः हिंदू असलो तरी मुसलमानांच्याविषयी व माझी जी प्रजा मुसलमान आहे तिच्याविषयी मला नेहमीच कळकळ वाटते." १९०९ मध्ये न्यायमूर्ती चंदावरकरांना हिंदू स्त्रियांच्या शिक्षणाकरिता १ लाख रुपयांची मदत केली. आजच्या रुपयाच्या मूल्यात ही रक्कम अंदाजे ३० कोटी रु.हून अधिक भरते.

१९१२ मध्ये बेंगळुर धर्म परिषदेस ५०० रु.ची मदत सयाजीरावांनी केली. १९१३ मध्ये त्यांनी बडोद्यातील जुम्मा मशिदीच्या जीर्णोद्धारासाठी ४,००० रु.ची मदत केली. ही रक्कम आजच्या रुपयाच्या मूल्यात अंदाजे १ कोटी रु.हून अधिक भरते. १९१६ मध्ये बनारस हिंदू विद्यापीठाला सयाजीरावांनी १ लाख रु.ची मदत केली. आजच्या रुपयाच्या मूल्यात ही रक्कम अंदाजे २५ कोटी रु. हून अधिक भरते. १९१६ मध्येच मेसापोटेमिया येथील सेंट जोन्स ॲम्ब्युलन्स फंडास १२०० रु.ची मदत केली.

१९१६ मध्ये भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्था, पुणे या भारतातील अग्रगण्य प्राच्यविद्या संस्थेच्या स्थापनेसाठी १००० रु. चे आर्थिक साहाय्य सयाजीरावांनी केले. ही रक्कम आजच्या रुपयाच्या मूल्यात सुमारे २५ लाख रु. हून अधिक भरते. भांडारकर संस्थेच्या स्थापनेपासून म्हणजेच १९१६ ते १९४० अशी २४ वर्षे सयाजीरावांनी ५०० रु. वर्षासन सुरू केले. ही मदत एकूण १२००० रु. इतकी भरते. तर महाभारताच्या प्रकाशनाकरता १९२२ मध्ये पुण्यातील भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्थेला ५,५०० रुपयांची मदत सयाजीरावांनी केली. आजच्या रुपयाच्या मूल्यात ही रक्कम १ कोटी ४० लाख रु.हून अधिक भरते. भांडारकर संस्थेला सयाजीरावांनी आपल्या कारकीर्दीत केलेली मदत एकूण १८५०० रु. भरते. आजच्या रुपयाच्या मूल्यात ही रक्कम ४ कोटी ५८ लाख रु. हून अधिक भरते.

१९२१ मध्ये हैदराबाद ब्राम्हो समाजास २००० रु.ची मदत सयाजीरावांनी केली. त्याच वर्षी जेरूसलेम म्युझियमलादेखील ३७९ रु.ची मदत त्यांनी केली. १९२४ मध्ये मुंबई येथे झालेल्या अखिल भारतीय तत्त्वज्ञान परिषदेचे सयाजीराव अध्यक्ष होते. १९२७ मध्ये रायगडावरील धर्मशाळेच्या बांधकामासाठी सयाजीरावांनी ५ हजार रुपयांची मदत केली. सर्व धर्मीयांना इतकी मदत करणारा सयाजीरावांसारखा दुसरा प्रशासक आपल्याला आधुनिक भारताच्या इतिहासात सापडत नाही.

## विविध धर्मीयांकडून देण्यात आलेली मानपत्रे

१९२५ मध्ये सयाजीरावांच्या राज्यारोहणाला ५० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल विविध धर्मीयांकडून त्यांना देण्यात आलेली मानपत्रे त्यांच्या धर्मविषयक संवादी नात्याचे प्रतिबिंब आहेत.

### १) अंजुमन-इ-इस्लाम -

"जो हक थे रयते सुन्नीके कुछ तो दिये है कुछ देवोंगे ।
सबपर है निगाह महाराजा की सुबान अल्लाह सुबान अल्लाह ।।"

अशा शब्दात मुसलमानांना सयाजीरावांनी इतर धर्माच्या प्रजेप्रमाणें समत्वाने वागविल्यांबद्दल त्यांचे आभार मानले.

### २) पारशी धर्मीय -

"आपण आमच्या लहानशा जातीचे रक्षक आहा"

### ३) प्रोटेस्टंट ख्रिस्ती समाज -

"महाराजांनी आपल्या कारकीर्दीत ख्रिस्ती धर्माच्या सर्व

धार्मिक प्रयत्नांना मदत करून, ख्रिस्ती प्रजेच्या वसाहतीसाठीं जमिनी दिल्याबद्दल" आभार मानले.

### ४) रोमन कॅथॉलिक समाज -

" साधार अशा जुन्या हकीकतीवरून असे निष्पन्न झाले आहे की, सन १३२१ सालीं आमच्या समाजावर केल्या गेलेल्या धार्मिक जुलूमामुळे तींतील पुष्कळ लोक बडोद्यास आश्रयासाठीं येऊन राहिले होते. आपल्या कारकीर्दीतही आमच्या जातीच्या अनेक लोकांना या राज्याच्या निरनिराळ्या खात्यांत सेवा करण्याची संधी मिळाली आहे. या कारणांनी आम्ही आपल्याबद्दल कृतज्ञ आहोत."

### ५) अखिल भारतवर्षीय हिंदू महासभा -

"इस समय हिंदू जातिको बडी कठिनाइओंका सामना करना पड रहा है. आभ्यंतरिक कष्ट तो अविवेकपूर्ण तथा अधार्मिक रीतिरस्मोंसे लिपटे रहने के कारण हैहि. परंतु बहारसे भी आक्रमण होनेसे हमारे उच्च तत्त्वज्ञान और उत्कृष्ट धर्मका लोप होनेका प्रसंग आने की आशंका होने लगी है. ऐसे समयपर आपने प्रजाकी सामाजिक उन्नतीका काम किया, पतित जातीओंका उद्धार किया, बालविवाहकी बुराइयां दूर कीं, और इतर बहुतेरी सामाजिक कुरीतियां नष्ट कीं, जिससे आपका नाम पतितपावन सार्थ है."

धर्म, संस्कृती, समाज यांचा तुलनात्मक अभ्यास हा सयाजीरावांच्या बौद्धिक सवयीचा भाग होता. तुलनात्मक व्यासंगामुळे सर्व धर्मांबाबत तटस्थ आणि संतुलित दृष्टिकोन हा सयाजीरावांच्या प्रशासकीय धोरण आणि कार्यक्रमाचा आत्मा होता. सयाजीरावांचा तुलनात्मक धर्म अभ्यास आणि धर्म साक्षरतेचे महाअभियान किती व्यापक होते याची साक्ष देणारे तपशील आपण चर्चिले. या तपशिलांची तुलना आपण जेव्हा महात्मा फुले आणि बाबासाहेब आंबेडकर यांच्यासारख्या क्रांतिकारक धर्मचिंतकांशी करतो तेव्हाच सयाजीरावांचे धर्मचिंतन या दोघांच्याही कितीतरी पटीने पुढे जाणारी आणि धर्म जात संघर्षाच्या आजच्या स्थितीला हाताळण्यासाठी आपल्याला अतिशय उपयुक्त ठरणारे असल्याचे स्पष्ट होते. म्हणूनच सयाजीरावांच्या धर्मचिंतनाची पारायणे भारताला व्याधीमुक्त करण्यासाठीचे सर्वोत्तम औषध म्हणून अपरिहार्यपणे करावी लागतील.

●●●

## महाराजा सयाजीराव ज्ञानमाला नामसूची

१) शिवसृष्टीचे निर्माते - सागर मोहिते
२) कृतीशील सत्यशोधक - दिनेश पाटील
३) राजर्षी शाहू - दिनेश पाटील
४) एक 'क्रांतीपर्व' - आंबेडकर - दिनेश पाटील
५) दानशूर महाराजा सयाजीराव - डॉ. राजेंद्र मगर
६) दामोदर सावळाराम यंदे - राजश्री कदम
७) खासेराव जाधव - शिवानी घोंगडे
८) कृष्णराव अर्जुन केळूसकर - सुरक्षा घोंगडे
९) सावित्रीबाई फुले - शिवानी घोंगडे
१०) विठ्ठल रामजी शिंदे - पवन साठे
११) गंगारामभाऊ म्हस्के - दिनेश पाटील
१२) रियासतकार गो. स. सरदेसाई - दिनेश पाटील
१३) योगी अरविंद घोष - डॉ. राजेंद्र मगर
१४) महाराणी चिमणाबाई सयाजीराव गायकवाड - सुरक्षा घोंगडे
१५) कर्मवीर भाऊराव पाटील - शिवानी घोंगडे
१६) बडोद्यातील वेदोक्त - राजश्री कदम
१७) धर्म खाते - सुरक्षा घोंगडे
१८) हिंदू पुरोहित कायदा - देवदत्त कदम
१९) तुलनात्मक धर्मचिंतक - देवदत्त कदम
२०) जातविषयक चिंतन - सुरक्षा घोंगडे
२१) इंदिराराजेंचा क्रांतिकारक विवाह - देवदत्त कदम
२२) हिंदू कोड बिल - देवदत्त कदम
२३) दुसरी जागतिक सर्वधर्म परिषद - डॉ. राजेंद्र मगर
२४) सक्तीचा प्राथमिक शिक्षण कायदा - राजश्री कदम
२५) स्त्रीविषयक कार्य - शिवानी घोंगडे
२६) मराठी भाषा, साहित्य व संस्कृती - निलोफर मुजावर
२७) संस्कृत शिक्षण - निलोफर मुजावर
२८) धर्मानंद कोसंबी - निलोफर मुजावर
२९) बौद्ध धर्म - सौरभ गायकवाड
३०) मराठी पत्रकरीता - सौरभ गायकवाड
३१) नानासाहेब शिंदे - देवदत्त कदम
३२) महात्मा गांधी - दिनेश पाटील
३३) श्रीधर व्यंकटेश केतकर - सौरभ गायकवाड
३४) प्राच्यविद्या - सौरभ गायकवाड
३५) आरोग्य आणि व्यायामविषयक कार्य - शिवानी घोंगडे
३६) अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषद - सत्यनारायण आरडे
३७) भारताचा स्वातंत्र्यलढा - राहुल वणवे
३८) महाराजा सयाजीराव आणि जगप्रवास - दिनेश पाटील
३९) निर्व्यसनी, चारित्र्यवान, सार्वभौम राजा - बाबा भांड
४०) ललितकला - धारा भांड मालुंजकर

४१) राजा रवी वर्मा - धारा भांड मालुंजकर
४२) बालगंधर्व - धारा भांड मालुंजकर
४३) दादासाहेब फाळके
 - धारा भांड मालुंजकर
४४) बडोद्यातल्या वास्तू
 - धारा भांड मालुंजकर
४५) संगीत शिक्षण - धारा भांड मालुंजकर
४६) बडोद्याचे कलाभवन
 - सौरभ गायकवाड
४७) बँक ऑफ बडोदा - देवदत्त कदम
४८) दुष्काळ दौऱ्याच्या नोंदी
 - दिनेश पाटील
४९) शेतीविकास - देवदत्त कदम
५०) उद्योग विकास - सौरभ गायकवाड
५१) सहकार विकास - राहुल वणवे
५२) जलनियोजन (जलसंवर्धन)
 - डॉ. राजेंद्र मगर
५३) पूरनिवारण - डॉ. राजेंद्र मगर
५४) सत्यशोधक धामणस्कर
 - सत्यनारायण आरडे
५५) बडोद्याचा लक्ष्मीविलास पॅलेस
 - पवन साठे
५६) लोकपाळ राजा सयाजीराव : चरित्र
 - बाबा भांड
५७) यशवंतराव चव्हाण - दिनेश पाटील
५८) धर्म विचार - बाबा भांड
५९) राजाराम शास्त्री भागवत - बाबा भांड
६०) छत्रपती शाहू - बाबा भांड
६१) महाराजा सयाजीराव ‘प्रजासत्ताक’
 राजा - अनिल वकटे
६२) महात्मा फुले, मामा परमानंद आणि
 सायाजीरावांना पत्रे - मामा परमानंद
६३) बहुजनांच्या शिक्षणासाठी मदत
 - बाबा भांड
६४) आरक्षण : सयाजीरावांचे आणि
 शाहुंचे - दिनेश पाटील
६५) दानशूर महाराजा सयाजीराव आणि
 जमशेटजी टाटा - डॉ. राजेंद्र मगर

आपणास वरील पैकी काही ई-बुक हवे असल्यास संपर्क करावा

बाबा भांड - ९८८१७४५६०४, दिनेश पाटील -९६२३८५८१०४,
डॉ. राजेंद्र मगर -९४२०३७८८५०, धारा भांड मालुंजकर - ९८८१७४५६०८
महेश मोधे - ८७८८२०८९९०

## महाराजा सयाजीराव प्रकाशित साहित्य :

❒ **महाराष्ट्र शासन : २५ खंडातील ६२ ग्रंथ = २६६४२ पृष्ठे**

**<u>मराठी :</u>**

- भाषण संग्रह : २ ग्रंथ
- पत्रसंग्रह : ३ ग्रंथ
- गौरवगाथा : १ ग्रंथ
- सयाजीराव लेखन : २ ग्रंथ
- सुप्रशासन : २ ग्रंथ
- जगप्रवास : ३ ग्रंथ
- शिक्षण सुधारणा : १ ग्रंथ
- आठवणी व लेख : ३ ग्रंथ
- सयाजीराव चरित्रे : ५ ग्रंथ
- सुधारणा : १० ग्रंथ = एकूण ३२ ग्रंथ

**<u>English</u>**

- Spechess & Adresses : 2 Books
- Letters : 4 Books
- Writings of Sayajirao : 2 Books
- Administration : 1 Books
- World Tour Reports : 3 Books
- Education Reforms : 3 Books
- Biographies : 5 Books
- Total English Books : 20

**<u>हिन्दी :</u>**

- सयाजीराव का लेखन : १
- स्वतंत्र्य युद्ध के समर्थक : १
- सयाजीराव जीवनी : २
- भाषण संग्रह : २
- पत्र संग्रह : ३
- गौरवगाथा : १ = १० ग्रंथ

**साहित्य संस्कृती मंडळ आणि अकादमी : ५ ग्रंथ**

- महाराजा सयाजीराव ट्रस्ट : ३० ग्रंथ
- साकेत प्रकाशन प्रा. लि. औरंगाबाद

कथा, कादंबरी, चरित्र्य, इतिहास, बोधकथा, किशोर कादंबरी, फुले, आंबेडकर, लिखित - संपादित १३ ग्रंथ

---

- महाराष्ट्र शासन प्रकाशित ग्रंथ शासकीय ग्रंथ गार आणि अधिकृत विक्रेते साकेत प्रकाशन यांचेकडे उपलब्ध.
- सयाजीराव ट्रस्ट, शासन व साकेत प्रकाशनाचे महाराजा सयाजीरावांचे वरील ग्रंथ उपलब्ध :

---

साकेत प्रकाशन प्रा. लि., ११५ महात्मा गांधीनगर, औरंगाबाद ४३१००५
मो. : ९८८१७४५६०५, ९८८१७४५६०४

●●●

## महाराजा सयाजीराव ज्ञानमाला निर्मितीमागील भूमिका

महाराजा सयाजीराव गायकवाड हे फक्त आधुनिक भारतातील सगळ्यात प्रागतिक राजे होते असे नाही तर भारतासारख्या बहुसांस्कृतिक देशाचे 'बौद्धिक नेतृत्व'च ते करत होते. धर्म, जात, तत्त्वज्ञान, शिक्षण, दातृत्त्व, संशोधन, शेती, उद्योग, आरोग्य, क्रीडा, साहित्य, संस्कृती, ललित कला, प्राच्यविद्या, पुरातत्त्व, आंतरराष्ट्रीय संबंध, स्वातंत्र्यलढा इ. मानवी समाजाच्या सर्व अंगांना कवेत घेणाऱ्या क्षेत्रात त्यांनी निर्माण केलेले मानदंड आजही भारतासाठी आदर्श आहेत. त्यामुळे ते आधुनिक भारताचे निर्माते आणि म्हणूनच खरेखुरे 'महानायक' सुद्धा आहेत.

महापुरुषांचे चिंतन हे फक्त इतिहासाच्या स्वप्नरंजनासाठी किंवा इतिहासाचा पोकळ अभिमान बाळगण्यासाठी करायचे नसते. आपल्या समकालीन जगण्यातील समस्यांची उत्तरे शोधण्यासाठी, आपला जीवनसंघर्ष सकारात्मक करण्यासाठीसुद्धा या महापुरुषांचे पुनर्वाचन आवश्यक असते. इतिहास जितका वस्तुनिष्ठपणे आपण वर्तमानाशी जोडू तितका आपल्या समाजाचा भविष्यवेध आपल्याला अचूकपणे घेता येईल.

महाराजा सयाजीरावांचा 'उदोउदो' करण्यासाठी महाराजा सयाजीराव ज्ञानमालेची निर्मिती केलेली नाही. आजच्या आपल्या धार्मिक आणि जातीय संघर्षावर, शेती-उद्योगातील संकटांवर मात करण्यासाठी तसेच समाज म्हणून आपल्यातील 'विसंवाद' कमी करून 'सुसंवाद' वाढवण्याच्या व्यापक भूमिकेतून ही महाराजा सयाजीराव ज्ञानमाला आकाराला आली. या निमित्ताने आपला 'जोडून' वाचण्याची आणि त्यातून संवादाचे पूल उभारण्याची प्रेरणा सर्वांना मिळेल एवढे मात्र नक्की.

पहिल्या टप्प्यात साठ ई-बुक झाले आहेत.

**बाबा भांड**
सचिव

**दिनेश पाटील**
संपादक
महाराजा सयाजीराव ज्ञानमाला

**महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन व प्रशिक्षण संस्था**
११५, म. गांधीनगर, स्टेशन रोड,
औरंगाबाद - ४३१ ००५
मो. - ९८८१७४५६०४
ई-मेल : sayajiraogsps@gmail.com